बृहन्मुंबई महानगरपालिका
परिपत्रक
2019-20

क्र.साप्रवि/ एफजीआर / 11 दि.22.08.2019.

विषयः-कार्यभार भत्ता सुधारित करण्याबात.

संदर्भः 1) क्र.शासन निर्णय क्र.वेतन 1311/प्र.क्र.17/सेवा-3 दि.27.12.2011

2) परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/19 दि.5.12.2012

3) क्र.शासन शुध्दीपत्र क्र.वेतन/1311/प्र.क्र.17/सेवा-3 दि.1.6.2015

4) परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/ 10 दि.15.10.2015.

5) स्थायी समिती ठराव क्र.1710 दि.13.02.2019.

6) महानगरपालिका ठराव क्र.48 दि.31.05.2019.

मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 मधील नियम क्र.52 (2) नुसार कोणत्याही संविधीक (वैधानिक) पदांना लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणी एवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या महानगरपालिका कर्मचा-याला अतिरिक्त वेतन/विशेष वेतन लागू होणार नाही अशी तरतुद आहे. त्यामुळे वैधानिक पदे व सदर पदांची वेतनश्रेणी एवढी वेतनश्रेणी लागू असणारी अन्य पदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास त्यांना कार्यभार भत्ता अनुज्ञेय होत नाही.

मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेश क्र.MCP/6678 दि.07.05.2018 व संदर्भित स्थायी समिती/ महानगरपालिका ठरावानुसार संदर्भाधिन शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदीन्वये महानगरपालिका सेवा नियमावलीत नियम क्र.52 मध्ये सोबतच्या जोडपत्र 'अ' नुसार बदल करुन नियम सुधारित करण्यास पुढीलप्रमाणे मंजुरी मिळालेली आहे.

1. कोणत्याही सांविधीक (वैधानिक) पदाला (पदांना) लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणीएवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या अखिल भारतीय सेवेसह सर्व स्तरावरील महानगरपालिका अधिका-याला / कर्मचा-याला अतिरिक्त वेतन / विशेष वेतन अनुज्ञेय होईल.

2. महागाई भत्ता तसेच घरभाडे भत्ता व स्थानिक पुरक भत्ता देण्याच्या प्रयोजनार्थ सदर अतिरिक्त वेतन / विशेष वेतन यापुढेही विचारात घेतले जाणार नाही.

3. कार्यभार भत्ता मंजूर करण्यापुर्वी खालील अटींची पुर्तता होत असल्याची संबंधित कार्यालय प्रमुखांनी / विभाग प्रमुखांनी / प्रशासकीय विभागांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

अ) ज्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असेल ते पद कर्मचा-याने धारण केलेल्या पदास दुय्यम नसावे.

ब) कामात व जबाबदारीत विशिष्ट वाढ झालेली असावी.

क) ज्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येणार आहे त्यास स्वतंत्र अधिकारिता असावी.

सदरहू परिपत्रकातील मनपा सेवा नियमावलीतील बदल परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियमावली 1989 मध्ये सदर नियमाबाबत यथावकाश सुधारणा करण्यात येतील.

सर्व खाते प्रमुख आणि सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आस्थापना कर्मचा-यांना वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यास सूचित करावे.

सदर परिपत्रकाची प्रत महापालिकेच्या Intranet वर ftp://45.249.109.226 / Circulars / GAD / Dy C.A.Estt- II या साईटवर उपलब्ध आहे.

सही/-दि.11.07.2019	सही/-दि.12.07.2019	सही/-दि.26.07.2019
श्री.अशोक दा.रुपवते	श्री.प्रदिप पडवळ	श्री.मिलिन सावंत
उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)	प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.	सह आयुक्त (सा.प्र)

सही/-दि.13.08.2019	सही/-दि.14.08.2019	सही/-दि.19.08.2019
श्री.ए.एल.ज-हाड	श्री.प्रविण दराडे	श्री.प्रवीण परदेशी
अति.आयुक्त (शहर)	अति.आयुक्त (प्रकल्प)	मा.महानगरपालिका आयुक्त

जोडपत्र 'अ'

विद्यमान नियम	प्रस्तावित नियम
बृहन्मुंबई मनपा (सेवा) नियम 1989 **नियम क्र.52 नियुक्त्यांचे एकत्रीकरण/ कार्यभार भत्ता** 52(2)i)इतर प्रत्येक पदाच्या बाबतीत, महानगरपालिका आयुक्त किंवा स्थायी समिती, यथास्थिती, निश्चित करतील तेवढे रास्त अतिरिक्त वेतन / विशेष वेतन देण्यात यावे. कोणत्याही प्रकरणात त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या (अनुमानिक वेतनाच्या) वीस टक्क्यापेक्षा हे वेतन जास्त होता कामा नये. (दि.19.12.2011 पर्यंत लागू)	
ii) दि.20.12.2011 पासून अनुज्ञेय कार्यभार भत्ता: दुस-या पदाच्या वेतनाच्या / उच्च पदाच्या संभाव्य वेतनाच्या 5% परंतु, दरमहा रु.750/- एवढया मर्यादेपर्यंत सिमित राहिल.	वगळण्यात आले.
iii) दि.1.1.2012 पासून अनुज्ञेय कार्यभार भत्ता: दुस-या पदाच्या वेतनाच्या / उच्च पदाच्या संभाव्य वेतनाच्या 5% परंतु, दरमहा रु.1500/- एवढया मर्यादेपर्यंत सिमित राहिल.	वगळण्यात आले.
iv) दि.15.10.2015 पासून अनुज्ञेय कार्यभार भत्ता: दुस-या पदाच्या वेतनाच्या /उच्च पदाच्या (त्याचे पे बँन्ड मधील वेतन + ग्रेडपे) वेतनाच्या 5% दराने अनुज्ञेय होईल	बदल नाही.
कोणत्याही सांविधीक (वैधानिक) पदाला (पदांना) लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणीएवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या महानगरपालिका कर्मचा-याला अतिरिक्त वेतन / विशेष वेतन अनुज्ञेय असणार नाही.	कोणत्याही सांविधीक (वैधानिक) पदाला (पदांना) लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणीएवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या अखिल भारतीय सेवेसह सर्व स्तरावरील महानगरपालिका अधिका-याला / कर्मचा-याला अतिरिक्त वेतन / विशेष वेतन अनुज्ञेय होईल.
नियम क्र.52 (2) टिप:- काहीच नाही	नियम क्र.52 (2) टिप:- अ.] महागाई भत्ता तसेच घरभाडे भत्ता व स्थानीक पुरक भत्ता देण्याच्या प्रयोजनार्थ सदर अतिरिक्त वेतन / विशेष वेतन यापुढेही विचारात घेतले जाणार नाही.

	ब.] कार्यभार भत्ता मंजूर करण्यापुर्वी खालील अटींची पुर्तता होत असल्याची संबंधित कार्यालय प्रमुखांनी / विभाग प्रमुखांनी / प्रशासकीय विभागांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे. 1) ज्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असेल ते पद कर्मचा-याने धारण केलेल्या पदास दुय्यम नसावे. 2) कामात व जबाबदारीत विशिष्ट वाढ झालेली असावी. 3) ज्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येणार आहे त्यास स्वतंत्र अधिकारिता असावी.
टिप: (ए) जेव्हा एखादया महानगरपालिका कर्मचा-याला दुस-या पदाची कर्तव्ये पूर्णपणे आणि जबाबदारीने पार पाडता येत नसतील तेव्हा त्याला दुस-या पदाची चालू कर्तव्ये पार पाडण्यास केवळ प्रभारी म्हणून नेमावे आणि त्याचे एकूण वेतन हे पहिल्या पदाचे वेतन अधिक दुस-या पदाच्या संभाव्य (अनुमानिक) वेतनाच्या 1/5 दरापेक्षा जास्त नाही, एवढया दराने अतिरिक्त वेतन / विशेष वेतन यापेक्षा जास्त होता कामा नये परंतु, जो महानगरपालिका कर्मचारी आपल्या स्वतःच्या पदाची कर्तव्ये सांभाळून दुस-या पदाचा कार्यभार सोळा दिवसाहून कमी कालावधीकरिता सांभाळीत असेल त्याला अतिरिक्त वेतन /विशेष वेतन अनुज्ञेय होणार नाही. आणखी असे की, कोणत्याही सांविधीक (वैधानिक) पदाला (पदांना) लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणी एवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या महानगरपालिका कर्मचा-याला अतिरिक्त वेतन / विशेष वेतन अनुज्ञेय होणार नाही	टिप: (ए) जेव्हा एखादया महानगरपालिका कर्मचा-याला दुस-या पदाची कर्तव्ये पूर्णपणे आणि जबाबदारीने पार पाडता येत नसतील तेव्हा त्याला दुस-या पदाची चालू कर्तव्ये पार पाडण्यास केवळ प्रभारी म्हणून नेमावे आणि त्याचे एकूण वेतन पहिल्या पदाचे वेतन अधिक 52 (2) मधील नमूद केलेल्या दराने कार्यभार भत्ता यापेक्षा जास्त होता कामा नये. परंतु, अनुज्ञेय असलेला कार्यभार भत्ता कमीत कमी एक महिना किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी अतिरिक्त कार्यभार असल्यासच देय असेल.(परिपत्रक क्र.एमओएम / 4064 दि.5.7.2007 नुसार) दि.14.6.2007 पासून प्रभाव्य. कोणत्याही सांविधीक (वैधानिक) पदाला (पदांना) लागू असलेल्या वेतनमानाएवढे (वेतनश्रेणीएवढी) वेतनमान (वेतनश्रेणी) असलेल्या अखिल भारतीय सेवेसह सर्व स्तरावरील महानगरपालिका अधिका-याला / कर्मचा-याला अतिरिक्त वेतन / विशेष वेतन अनुज्ञेय होईल.